महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८४/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १४ जून, २०१७

**प्रस्तावना -**

एस.एस.ए. एज्युकेशनल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, गोंदिया संचलित एस.एस.ए.इंटरनॅशनल स्कूल, ढाकणी, गोंदिया या नवीन इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी, राज्यमंडळ, सर्व शाखा) शाळेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेला खालील प्रस्ताव पात्र ठरत असल्यामुळे या प्रस्तावास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | एस.एस.ए. एज्युकेशनल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, गोंदिया | एस.एस.ए. इंटरनॅशनल स्कूल, ढाकणी, गोंदिया | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी राज्यमंडळ, सर्व शाखा) | इंग्रजी |

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

२.३ सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,** २०१२ (सन २०१३ चा ०१) मधिल सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक, यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी. .

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

२.८ परवानगी दिलेल्या स्वयं अर्थसहाय्यित शाळेत शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नेमणूक शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर
७. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (प्राथमिक / माध्यमिक), गोंदिया
८. निवडनस्ती (एसएम २).

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

# कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर

४५, बालभारती (दत्तप्रसाद) धंतोली, नागपूर
फोन. नं. ०७१२-२४२१३९८, ईमेल, dydnapgur@rediffmail.com


जा.क्र. माध्य/ब/स्वअर्थ/ ४०७४ /२०१९
दिनांक - 30 MAY 2019

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
एस.एस.ए एज्युकेशनल ॲन्ड,
वेल्फेअर सोसायटी, गोंदिया

**विषय** :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नविन शाळा**/दर्जावाढ करण्यासाठी **२०१६-१७** या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ** :-१) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८४/एसएम-२ दिनांक १४ जून २०१७

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गोंदिया | एस.एस.ए. एज्युकेशनल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, गोंदिया | एस.एस.ए. इंटरनॅशनल स्कूल ढाकणी गोंदिया | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा ) | राज्यमंडळ | इंग्रजी | सन २०१६-१७ पासून |

**अटी व शर्ती**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तुरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानूसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णयांच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या आत** शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल ठरेल.**

४. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) शासनाच्या महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

५. संबधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यांस शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

७. **यु-डायस डाटाः-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नविन शाळा/दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे , संस्थेने, सर्व संबधितांच्या माहितीकरीता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

८. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती** शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**(सतिश मेंढे)**
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग, नागपूर**

**प्रतिलिपी-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद **गोंदिया** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे? याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. मुख्याध्यापक **एस.एस.ए. इंटरनॅशनल स्कूल ढाकणी गोंदिया** यांना माहितीस्तव अग्रेषित.

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

**स्वयं अर्थसहाय्यीत तत्ववारील शाळा परवानगीबाबत** 1307

क्र.जिपगो/प्राथ/खाप्राशा/प्रखामा/डेस्क-६/वशि/ /२०१८

(कार्यालय जिल्हा परिषद, गोंदिया)

शिक्षण विभाग (प्राथमिक)

दिनांक :- 6/7/2019

प्रति,

अध्यक्ष/सचिव,

एस.एस.ए. एज्युकेशनल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, गोंदिया

**विषय :-** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच, विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक/एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८४/ एसएम-२ दिनांक १४ जुन २०१७

३) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र क्र.जा.क्र. प्राथ/ब/स्वअर्थ/४७४५/ २०१९ दिनांक ३० मे २०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विननियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नविन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार तसेच संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इय्यता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | एस.एस.ए. एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी गोंदिया | एस.एस.ए. इंटरनॅशनल स्कुल ढाकणी गोंदिया | इंग्रजी (राज्यमंडळ) | नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) | इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा | २०१६-२०१७ पासुन |

**अटी व शर्ती**

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेच ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन असेल.

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत.

५) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा( स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पत्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावने बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्र व्यव्हारावर स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहीने बंधनकारक राहील.

७) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात स्थालांतरन करता येणार नाही.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा ( स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परावानगी दिलेल्या शाळांना यु- डायस मध्ये माहिती भरताना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

९) माध्यमिक शाळा संहिता अधिनियम मधील नियम ३.२ मध्ये नमुद अटी व शर्ती पुर्ण करण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावनी करने बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया

प्रतिलीपी :- १) मुख्याध्यापक, एस.एस.ए. इंटरनॅशनल स्कुल ढाकणी गोंदिया यांना माहितीस्तव अग्रेषित.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager

ई:/माध्य/नावात बदल

# कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर

बालभारती बिल्डींग धंतोली, नागपूर
फोन. नं. ०७१२-२५६०१०५, ईमेल, dydnapgur@rediffmail.com

क्रमांक माध्य./ड/ ५५०६/२०१९
दिनांक :- 28 JUN 2019

प्रति,
अध्यक्ष/ सचिव
एस. एस.ए. एज्युकेशन एन्ड वेलफेअर सोसायटी
गोंदिया.

विषय – शाळेच्या नावात बदल करण्याबाबत.

संदर्भ – आपले पत्र दिनांक १८/०६/२०१८

एस.एस.ए. एज्युकेशन एन्ड वेलफेयर सोसायटी व्दारा संचालीत एस.एस.ए इन्टरनेशनल स्कूल, ढाकणी या शाळेचे नावात बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त असून आपणास कळविण्यात येत आहे की, शाळेचे नाव बदलविण्यास संस्था सक्षम आहे. संस्थेचा दिनांक २५/०५/२०१९ रोजीच्या ठरावानुसार शाळेच्या नावात करण्यात आलेल्या बदलाची नोंद खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

| **शाळेचे जूने नाव** | **शाळेचे बदलानंतरचे नाव** |
|---|---|
| **एस.एस.ए इन्टरनेशनल स्कूल,ढाकणी जि. गोंदिया** | **माउंट लिटरा झी स्कूल, ढाकणी, जि. गोंदिया** |

(सतिश मेंढे)
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग नागपूर**

**प्रतिलिपी –**

१) लेखाधिकारी (शिक्षण विभाग) गोंदिया
२) शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य.) जि. प. गोंदिया
३) अधिक्षक, वेतन व.भ.नि.नि. पथक (प्राथ/माध्य.) गोंदिया.
४) विभागिय सचिव, शिक्षण मंडळ, नागपूर
५) मुख्याध्यापक एस.एस.ए इन्टरनेशनल स्कूल, ढाकणी, गोंदियायांना माहितीस्तव अग्रेषित.

Mount Litera Zee School, Gondia
Director

Mount Litera Zee School, Gondia
Principal

Mount Litera Zee School, Gondia
Manager